UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष :९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०९





इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
|| श्री विश्वनाथो विजयते ||
स्थापना : ९ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

## पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

**● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ९**

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्रा.डॉ.बी.आर.मस्के ● प्रा.डॉ.दिपाली भावे ● प्रा.प्रफुल राजुरवाडे

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ पं. जवाहरलाल नेहरू : स्वातंत्र्योत्तर भारतातील शैक्षणिक क्षेत्राचे शिल्पकार
- डॉ.सौ.अभिलाषा राऊत, नागपूर ---------------------------------------- ८

२ भारत देशाच्या कृषी क्षेत्रातील विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान - डॉ.अफरोज शेख, नागपूर १३

३ आधुनिक भारताच्या इतिहासात बाबू हरदास एल. एन. यांचे सामाजिक व राजकीय योगदान
- डॉ.आनंद सूर्यवंशी, नागपूर ---------------------------------------- १६

४ अर्वाचीन योगसाहित्य: ध्यान विमर्श - डॉ.अरुणा पवार, नागपूर ---------------------------------------- २१

५ स्वातंत्र्य संग्रामातील वीरांगना - मॅडम कामा
- डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे. ---------------------------------------- २५

६ १९२० ते १९४७ या काळातील स्वातंत्र्यचळवळीतील महिलांचे योगदान कस्तुरबा गांधी व सहकारी महिला - डॉ.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे ---------------------------------------- २९

७ राष्ट्र बांधणीमध्ये स्त्रीया, दलित आणि आदिवासी यांचे योगदान
- डॉ.अशोक शहाणे, उमरेड, जि.नागपूर ---------------------------------------- ३३

८ आंबेडकरोत्तर भूमिहीन सत्याग्रहात समता सैनिक दलाचे योगदान
- डॉ.बी. आर. मस्के, नागपूर ---------------------------------------- ३८

९ ई. व्ही. रामास्वामी पेरियार यांच्या कार्यांचा भारतीय समाजव्यवस्थेवरील प्रभाव
- डॉ. भास्कर बघाळे, नागपूर ---------------------------------------- ४२

१० वर्षावास, भिक्खु संघ व दानादि कर्म
- १)डॉ.भीमदेवी डांगे, २) डॉ.स्निग्धा राजेश कांबळे, ब्रह्मपुरी ---------------------------------------- ४६

११ १९४६ नागपूर येथील सत्याग्रह आणि ॲड. हरिदास बाबू आवळे यांची भूमिका
- डॉ.चंद्रशेखर पाटील, नागपूर ---------------------------------------- ५२

१२ आधूनिक भारताचे निर्माते महात्मा जोतिराव फुले यांची शेतकरी चळवळ
- डॉ.दत्ता हिंगमिरे, उरण, जि.रायगड . ---------------------------------------- ५६

१३ राजश्री शाहु महाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान - डॉ. देविदास गाडेकर, नागपूर ---------------------------------------- ६०

१४ महात्मा जोतिराव फुले आणि सामाजिक न्याय - [illegible] ६३

१५ ज्ञानोदय व ख्रिचन मिशनरींचे सामाजिक कार्य - [illegible] ---------------------------------------- ६७

१६ अहमदनगर जिल्ह्यातील [illegible]
- [illegible] ---------------------------------------- ७०

१७ आधुनिक [illegible] ७३

१८ [illegible] योगदान
- [illegible] ---------------------------------------- ७६

१९ [illegible] ---------------------------------------- ८०

२० [illegible]
- [illegible] ---------------------------------------- ८४

ISSN No. 2394-5990


२१ **ईस्ट इंडिया कंपनी कालीन कायदे – चिकित्सक आढावा (इसवी सन १७५७ ते १८५८)**
– डॉ. गोवर्धन दिकोंडा, माढा, जि.सोलापूर ------------------------------------ ८६

२२ **सामाजिक इतिहासाचे महत्व व समाजशास्त्रीय विचारांचा इतिहास**
– डॉ.हरिदास जाधव, शिरूर, जि.पुणे ------------------------------------ ९०

२३ **बार्डोली सत्याग्रहातील वल्लभभाई पटेल यांची भूमिका**
– डॉ.जयंत रामटेके, सडक अर्जुनी, जि.गोंदिया ------------------------------------ ९३

२४ **स्वातंत्र्योत्तर काळातील कृषी विकासाच्या प्रगतीच्या प्रवृत्तीचा अभ्यास**
– डॉ. के.पी.देशमुख, महागाव, ता.गडहिंगलज, जि.कोल्हापूर -------------------- ९९

२५ **राष्ट्रउभारणीत (विकास) कृषी आणि उदयोग क्षेत्राचे योगदान** – डॉ.के.जी.ढोबळे, अमरावती -- १०४

२६ **आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर** – डॉ.के.बी.वासनिक, गोंदिया ---- ११०

२७ **१८५७ च्या उठावतील आदिवासी क्रांतिकारक राणी अवन्तीबाईचे योगदान**
– डॉ.लक्ष्मण गोरे, २) प्रदीप चव्हाण, ?? ------------------------------------ ११४

२८ **आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
– १) डॉ. एल. एच.नंदेश्वर, २) डॉ.आर.एम. मेश्राम, ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर. ---------- ११९

२९ **दलित चळवळींचा राष्ट्र उभारणीमधील सहभाग**
– डॉ. माधुरी देवतळे, नागपूर ------------------------------------ १२४

३० **राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतील मुलतत्त्वे आणि बौद्ध विचार**
– डॉ.महेंद्र गायकवाड, नागपूर ------------------------------------ १३०

३१ **आधुनिक भारताच्या जडणघडणीत नागपूर जिल्ह्यातील कामठी नगर पालिकेच्या कार्याचे योगदान**
– डॉ.ममता इलमकर, ?? ------------------------------------ १३३

३२ **राजसत्तेच्या फटीतून होळकर या मराठे सरदार घराण्यातील तुळसाबाई होळकर**
– डॉ.मंगला गोरे, नागपूर ------------------------------------ १३६

३३ **दलित स्त्री चळवळीच्या शिलेदार श्रीमती शांताबाई सरोदे**
– डॉ.मंजुषा धापूडकर, अमरावती ------------------------------------ १३९

३४ **वर्तमान शैक्षणिक व वैज्ञानिक विकास : मानवाच्या आर्थिक स्थैर्यास घातक**
– डॉ.मंजुषा ठाकरे, नागपूर ------------------------------------ १४१

३५ **डॉ. बी. आर. आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान : (जल नियोजनाच्या विशेष संदर्भात)**
– डॉ. निशांत शेंडे, नंदुरबार. ------------------------------------ १४६

३६ **स्वातंत्र्य सैनिक रायकुमार भोगीलाल गुजर यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान**
– डॉ.पद्माकर गोरे, शिरूर, जि.पुणे ------------------------------------ १४९

३७ **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी स्त्रियांचे योगदान : दुर्लक्षित महिलांच्या संदर्भात**
– डॉ.प्रज्ञा कामडी, मोवाड, ता.नरखेड, जि.नागपूर ------------------------ १५२

३८ **स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून स्त्रीमुक्तीत समाजसुधारकांच्या चळवळीचे योगदान**
– डॉ. प्रमिला भुजाडे, नागपूर. ------------------------------------ १५७

३९ **कम्युनल ट्रॅगल इन इंडिया** – डॉ. पी. ए. ओलेकर, आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली -------- १६२

४० **आधुनिक भारताचे निर्माते – डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
– डॉ.प्रतिभा गाडवे, नागपूर ------------------------------------ १६८

४१ **स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्यिक प्रगती**
- डॉ.प्रवीणा नागपूरकर, नागपूर ------------------------------------- १७३

४२ **लातूर जिल्हापरिषदेतील ओबीसींचा राजकीय विकास व आधुनिकीकरणाचे विश्लेषण (१९९२-२०१२)**
- १) डॉ. राहुल बावगे, नागपूर, २) डॉ.असीम खापरे, पुसद ------------------- १७६

४३ **भारतीय स्वातंत्र्य चळवळी संदर्भात जातीच्या प्रश्नाची डॉ.आंबेडकर कृत चिकित्सा**
- डॉ.राहुल गोंगे, नारायणगाव, जि.पुणे ----------------------------------- १७९

४४ **कोरोना विषाणूचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम**
- डॉ.राजेश बहुरूपी, भिवापूर -------------------------------------- १८२

४५ **आदिवासी जमातींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान** - डॉ.राजू पवार, शिरपूर, जि.धुळे. - १८५

४६ **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रीयांचे योगदान** - डॉ. राजू जाधवर, कळंबोली, नवी मुंबई---- १८८

४७ **भारतीय संविधान निर्मिती आणि विकास** - १)डॉ.रायन महाजन, नागपूर, २) डॉ.संदीप तुंदूरवार, नागपूर, ३) डॉ.शरद सांबारे, नागपूर, ४) डॉ.राहुल चुटे, मुरमाडी ---------------------- १९०

४८ **हरितक्रांती व त्याचे भारतीय कृषी क्षेत्रावर झालेले परिणाम**
- १)डॉ. सचिन भोगेकर, नागपूर, २) डॉ.नितीन कायरकर, नागपूर. ---------------- १९४

४९ **आधुनिक भारताच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान**
- डॉ. संजय ढवळे, मोहपा, जि.नागपूर ---------------------------------- १९८

५० **ग्रामीण क्षेत्रात नागरी आधारभूत सुविधांची तरतूद योजनेचा संक्षिप्त आढावा**
- डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, -------------------- २०२

५१ **भारतीय दुग्ध उद्योगाची कामगिरी**
- डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड --------------------- २०७

५२ **महाराष्ट्रातील कृषी विषयक विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान**
- डॉ.सतिश राठोड, नागपूर. ---------------------------------------- २१४

५३ **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्यांमधून दिसणारी समाज सुधारणाविषयक भुमिका : एक चिंतन**
- डॉ.शिल्पा शेटे, पाबळ, ता.शिरूर, जि.पुणे ------------------------------ २१७

५४ **१९४२ ची चले जाव चळवळ व पहिला झेंडा वंदन** - डॉ.श्रीकांत सोनटक्के, नागपूर, ------ २२४

५५ **राष्ट्रीय काँग्रेसच्या आरंभीच्या राजकारणात न्या. म. गो. रानडे यांची भूमिका**
- डॉ. श्रीनिवास सातभाई, अमरावती. --------------------------------- २२८

५६ **भारतीय स्वातंत्र्य लढ्याातील महिलांचे योगदान**
- १)डॉ.सोनिया डावरे, औरंगाबाद २)डॉ.शीला स्वामी, उस्मानाबाद ---------------- २३३

५७ **नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील परिवर्तन** - डॉ.सोनू लांडे, पनवेल, जि.रायगड ---------- २३७

५८ **वैश्विक स्त्रीवादाचे स्वरूप, भूमिका व वाटचाल** - डॉ. सुधाकर चौधरी, शिरपूर, जि.धुळे. --- २४१

५९ **छत्रपती शिवाजी महाराज यांचे जलव्यस्थापन**
- १)डॉ.सुजाता गौरखेडे, नागपूर, २)डॉ.सचिन बन्सोड, नागपूर ----------------- २४४

६० **बहिष्कृत हितकारिणी सभा : अस्पृश्य समाजाला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणणारी संस्था**
- डॉ.सूर्यकांत कापशीकर, नागपूर ------------------------------------ २५०

६१ **ओ.बी.सी समाजाची आरक्षण धोरणाबाबत राजकीय अनभिज्ञता**
- डॉ.सुशांत चिमणकर, नागपूर ------------------------------------ २५६

६२ **आधुनिक भारताच्या जडणघडणीत स्त्रीवादी साहित्याचे योगदान**
- डॉ.सुशिला लाखे, उमरेड, जि.नागपूर . -------------------------------- २६३

६३ **ब्रिटिशकालीन भारतीय रेल्वे आणि तिचे दुष्परिणाम (इ.स.१८५३-१९१४)**
- डॉ.यु.ए.पठारे, नारायणगाव, जि.पुणे ---------------------------------- २६८

६४ **माहिती तंत्रज्ञान युगात मूल्याधिष्ठीत समाज व मानवी संसाधन निर्मितीमध्ये माहितीची आवश्यकता : एक दृष्टीक्षेप** - डॉ.विजय बर्फे, शहादा, जि.नंदुरबार, --------------- २७३

६५ **स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नेतृत्व आणि लोकसहभाग**
- डॉ.विजय राऊत, नारखेड, जि.नागपूर . -------------------------------- २७६

६६ **आधुनिक भारताच्या निर्मितीत राजा राममोहन रॉय यांचे योगदान** - डॉ.विमल राठोड, नागपूर -- २८०

६७ **नवकवी बा.सी.मर्ढेकर- स्वातंत्रोत्तर कविता** - डॉ.विशाखा कांबळे, नागपूर ------------ २८३

६८ **सेनापती बापट यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विविध क्षेत्रांतील योगदान**
- डॉ. व्ही.आर.गवारी, अहमदनगर. ------------------------------------ २८६

६९ **कोण म्हणतं टक्का दिला (नाटक)** - डॉ.रमेश बलभीम जाधवर, कळंबोली, नवीमुंबई ------ २९१

७० **डॉ. पंजाबराव देशमुख यांचा 'भारत कृषी समाज' : एक आर्थिक अभ्यास**
- डॉ.बालाजी अण्णासाहेब सुरवसे, फोंडाघाट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग ------------ २९५

७१ **महात्मा गांधी यांचे नेतृत्त्व आणि चळवळ** - डॉ. रेखा जाधव, नागपूर --------------- ३००

♦♦♦

# भारत देशाच्या कृषी क्षेत्रातील विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान

**डॉ. अफरोज हनिफ शेख**
**प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख**
**श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर**

**प्रस्तावना :**

भारत देशाच्या स्वातंत्र्यानंतर आर्थिक क्षेत्रातील विकासासाठी महात्मा गांधीची ''ग्रामस्वराज्य'' या संकल्पनेची भूमिका महत्त्वाची ठरली कारण यामुळे ग्रामीण जनतेची पिळवणूक थांबवून त्यांना आपल्याच क्षेत्रात सर्व प्रकारच्या आधुनिक सुविधा उपलब्ध होईल ह्या तत्वाचा समावेश होता. आधुनिक भारताचे खरे शिल्पकार म्हणून जेव्हा आपण पंडित जवाहरलाल नेहरू यांचा उल्लेख करतो तेव्हा, जलसिंचन प्रकल्प, पोलाद प्रकल्प, मोठ्या प्रयोगशाळा, संशोधन संस्था हे त्यांच्या बुध्दिमत्तेचे आणि दूरदर्शीपणाचे द्योतक होते, असे दृष्टीस येते. पंडित नेहरूंच्या धोरणाप्रमाणे या देशात कृषी अर्थव्यवस्थेचा विकास करून अन्नधान्याची स्वयंपूर्णता निर्माण करणे, हे उद्दिष्ट होते आणि त्यादृष्टीनेच ''अधिक धान्य पिकवा'' ह्या मोहिमेचा पाया घातल्या गेला[१].

''धन्य आहे भारतभूमी'' ज्या भूमीच्या कुशीत अनेक कर्मयोगी पुत्रांनी जन्म घेतला व सम्पूर्ण आयुष्य आपल्या देशाच्या विकासात खर्ची घातले. त्या सर्वांना शत् शत् नमन. त्यांपैकी ह्या लघुशोध प्रबंधात मी फक्त स्वर्गीय वसंतराव नाईक 'कृषिक्रांतीचे जनक' म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीचे वर्णन करू इच्छिते.

**१) भूदान चळवळीतील योगदान :-**

स्वर्गीय विनोबा भावेजींच्या भूदान चळवळीचे वारे सर्वत्र वाहत होते. १९५१ मध्ये हैद्राबादजवळ सर्वोदय सम्मेलन भरले होते. त्यावेळेस रामचंद्र रेड्डी नावाच्या ग्रामस्थाने आपली शंभर एकर भूमी दान म्हणून विनोबाजींच्या हवाली केली. इथूनच खऱ्या अर्थाने 'भूदान चळवळीचे' बीजारोपण झाले. ह्या देशभक्तीने ओतप्रोत चळवळीपासून वसंतराव नाईक ही जास्त काळ दूर राहू शकले नाही. त्यांनी आपल्याजवळील जमीनीतील सहावा हिस्सा (भाग) विनोबाजींच्या भूदान चळवळीस अर्पण केला. त्यांच्या ह्या कार्याने प्रेरणा घेऊन यवतमाळ जिल्ह्यातील हजारो लोकांनी आपल्या जमिनी चंदूसिंग नाईक व मन्नाराम अग्रवाल आदींच्या सहकार्याने 'भूदान' म्हणून अर्पण केली. सम्पूर्ण महाराष्ट्रात व विदर्भात भूदान चळवळीचे लोण पसरविण्याचे कार्य वसंतराव नाईक यांनी केले. वसंतराव नाईक यांचे जवळचे मित्र आबासाहेब पारवेकर यांनी २१०० एकर जमीन 'भूदान' म्हणून प्राप्त केली.[२] १९५९ साली वसंतराव महाराष्ट्राचे कृषिमंत्री असताना त्यांच्या प्रयत्नाने एक लाख एकर जमीन भूदानात मिळाली. नंतर या जमिनीचे वितरण पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्यात आले.

अश्याप्रकारे वसंतराव नाईक ह्यांच्या प्रयत्नांमुळे ''भूदान'' म्हणून एवढी प्रचंड जमीन उपलब्ध होऊन लाखो लोकांना, जे भूमीहीन होते त्यांना भूमी मिळाली.

**२) शेतीच्या विकासात योगदान :-**

अ) कमाल मर्यादा जमीन कायदा :- ''कसेल त्याची जमीन आणि राहीन त्याचे घर'' असे जाहीर आवाहन वसंतराव नाईक यांनी शेतकऱ्यांपुढे केले. जुन्या परम्परागत पद्धतीनुसार शेती केल्याने विकास घडून येणार नाही म्हणून त्यांनी शेतीच्या पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे 'कसेल त्याची जमीन' हे तत्व कूळकायद्याने अमलात आले पण एखाद्याने आपल्याजवळ किती जमीन बाळगावी, याबद्दल सूत्रबध्द कायदा नसल्यामुळे याचा गैरफायदा जमीनदार वर्ग घेत असत. म्हणूनच आर्थिक विषमता नष्ट करण्याकरिता ''कमाल जमीन मर्यादा कायदा'' त्यांनी महाराष्ट्र राज्य विधानसभे समोर १९६१ मध्ये मांडला. या कायद्याचे शेतकऱ्यांनी सहर्ष स्वागत केले. कारण या कायद्यामुळे सरकारला मिळणारी जमीन शेतमजूर, भूमिहीन शेतकरी, सहकारी तत्वावरील शेती संस्था इत्यादींना मिळणार होती.[३]

ब) धान्य विकण्यासाठी 'ग्रेन मार्केट' ची स्थापना :- वसंतराव नाईक यांना शेतीबद्दल अत्यंत प्रेम व शेतकऱ्यांबद्दल नितांत आदर होता कारण ते स्वत: हाडाचे शेतकरी होते, त्यांना शेतकऱ्याच्या जीवनाबद्दल पूर्णत: कल्पना होती. शेतकऱ्यांची पिळवणूक होऊ नये, त्यांच्या धान्याला योग्य भाव मिळावा म्हणून त्यांनी पुसदला ''ग्रेन मार्केट'' सुरू केले[४]

क) ६८ कलमी बिल :- १९४३ मध्ये जेव्हा वसंतराव नाईक पुसद शेतकी संस्थेचे अध्यक्ष बनले. तेव्हा १९४६

मध्ये शेतकऱ्यांच्या फायद्याचे '६८ कलमी' नावाचे बील पास होण्याकरीता खूपच झटले. शेतकऱ्यांना बिलाचे महत्व पटवून दिले.[५]

ड) बँकामार्फत शेतकऱ्यांना आर्थिक मदत :- १९५१-५२ मध्ये मध्यप्रदेश राज्याच्या मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून वसंतवराव नाईक यांची नियुक्ती झाली. तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी अथक प्रयत्न केलेत. त्यांना आधुनिक पद्धतीने शेती करता यावी, यासाठी आधुनिक शेतीची अवजारे घेण्यासाठी अल्पव्याजदराने कर्ज उपलब्ध व्हावे तसेच कर्ज फेडण्यासाठी सुलभ हप्त्यांची सोय बँकांनी करून द्यावी, शेतीला पूरक असणाऱ्या अनेक लोकांनी जोड व्यवसायांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी आपली उत्पादन क्षमता वाढवावी, याकरिता वसंतराव नाईक सतत प्रयत्नशील होते, असे दिसून येते.[६]

इ) शेतकऱ्याला आत्मनिर्भर बनविण्याचा मंत्र :- इ. सन १९५६ मध्ये 'सहकारमंत्री' पदावर असताना त्यांनी शेतकऱ्यांची व गरीब जनतेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी बरीच कामे केलीत. नाले व नद्यांना बांध घालून ओलितांची योजना हाती घेतली.[७] महाराष्ट्रातील साडेतीन कोटी एकर जमिनीस बांधबंदिस्ती घालण्याच्या कामास त्यांनी वेगाने सुरूवात केली. शेतकऱ्याला पाणी मिळाले की तो चमत्कार करून दाखवितो. त्या दृष्टीने खेड्यात नदीच्या पाण्याचा विद्युत यत्रांच्या साह्याने उपभोग करून घेण्यासाठी ओढ्या-ओहळावर सुद्धा बंधारे घालून दुबार पिकांना चालना दिली. आज ही महाराष्ट्रात अनेक 'वसंत बंधारे' आाहेत.

ई) आंतरराष्ट्रीय प्रवासद्वारे शेतीसंबंधी नविन माहिती प्राप्त :- वसंतराव नाईक यांची १९५८ मध्ये जपानच्या आंतरराष्ट्रीय भात मंडळावर भारताचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली तेव्हा जपानला भेट देऊन तेथील भातशेती अभ्यासली. शेतीच्या क्षेत्रातील अलौकीक कार्याची ख्याती ऐकून साम्यवादी चिनी सरकारने त्यांना चीनला भेटीचे निमंत्रण पाठविले. १४ सप्टेंबर १९५८ ला चीनच्या 'टुंगपाशा' येथील ॲग्रिकल्चरल प्रोडयुसर्स कोऑपरेटीव्ह सोसायटीला भेट दिली. तसेच 'ॲनन' या ठिकाणी लोखंड व पोलादाच्या कारखान्यास व हसनगयव्ह येथील शेतकी संशोधन केंद्रास भेट दिली. अंगचाऊ येथे चहा उत्पादन करणाऱ्या केंद्रास व तेथील चिकींग शेतकी संशोधन संस्थेतही वसंतरावांनी भेट दिली. चीन, जपान नंतर सिंगापूर व कोलंबो या देशांना भेट दिली. कोलंबो येथे त्यांनी कापसावरील प्रक्रिया उद्योगाचा विशेषत्वाने अभ्यास केला तसेच शेतीविषयक पद्धतीची माहिती मिळवून घेतली. याच काळात इंडिया कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल फायनान्स सोसायटीचे सभासद म्हणून त्याची निवड झाली.[८] विदेशातून परतल्यावर भारतात त्यांनी विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आदि ठिकाणी आपल्या भाषणांद्वारे विदेशातून प्राप्त केलेल्या प्रगतीची, अत्याधुनिक शेतीची माहीती शेतकऱ्यांना करून दिली. शिवाय सहकारी तत्वावरील शेतीचे महत्त्व लोकांच्या लक्षात आणून दिले. जमीनीवरील नवनवीन प्रयोगामुळे, त्या नंतरच्या काळातील मार्गदर्शक ठरत होत्या. १९६३ नंतर वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना धान्याच्या तुटवड्याविरूद्ध राज्यभर मोहीम चालविण्यास ते समर्थ ठरलेत. यशवंतराव चव्हाण भारताचे सरंक्षण मंत्री असताना वसंतराव नाईकांबद्दल गमतीने शेरा मारताना म्हटले होती की, 'एखाद्याने वसंतराव झोपेत असताना पाण्याचे काही फवारे त्यांच्या चेहऱ्यावर मारले तर ते 'पाऊस पाऊस' ओरडत उठायचे'.[९]

फ) कृषी विद्यापीठाची स्थापना :- जगात जपान, चीन, अमेरिका, कोलंबो इ. देशांनी आधुनिक व यांत्रिक पद्धतीने शेतीचा विकास करून उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ केली होती. आपल्या देशाने ही कृषी क्षेत्रात विकास करणे ही काळाची गरज आहे म्हणून भारत सरकारने शेतीच्या विकाससंबंधी डॉ.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. त्यांनी आपल्या शिफारसीत ''कृषी विद्यापीठ'' स्थापन करावे अशी सूचना केली होती. त्या अनुषंगाने दि.७ सप्टेंबर १९६७ ला कृषी विद्यापीठ विषयक कायदा समंत करण्यात आला. महाराष्ट्रात एकूण ४ कृषी विद्यापीठ स्थापन झाले. कृषी विद्यापीठांद्वारे शेतकऱ्यांना शेतीची आधुनिक पद्धतीची माहिती दिली जाते व संशोधनाबद्दल जाणीव करून दिली जाते.[१०]

ग) वसंतराव नाईकांचे दुष्काळातील कार्य :- वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना १९६६-६७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळामुळे भंयकर परिस्थिती निर्माण झाली. संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा व हिम्मत देण्यासाठी वसंतरावानी दुष्काळी भागात दौरा काढला. राज्यातील २६ जिल्ह्यांपैकी २१ जिल्ह्यात १५७९९ गावांत टंचाईची परिस्थिती त्यांनी जाहीर केली. दुष्काळग्रस्त लोकांसाठी राज्यात बांधबंदिस्तीची २,३३३ आणि पाटबंधारे, पाझर तलाव, रस्ते इत्यादींची एकूण ४,८५७ कामे काढली. सुमारे साडेचार लाख लोकांना रोजगार देण्यात आला. अंदाजे टंचाईग्रस्त विभागातील एक कोटी वीस लाख आपदग्रस्त लोकांपैकी सुमारे पंचवीस

 ISSN No. 2394-5990

लाख लोकांना मदत व अन्य कामे पुरविली गेली. दुष्काळी कामावरील माणसांना दर महिना दर माणशी दहा किलो धान्य देण्यात आले. वसंतरावांच्या प्रेरणेने भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी दुष्काळी भागापैकी औरंगाबाद, नागपूर, भंडारा, पुणे जिल्ह्यांना भेटी दिल्या. राज्यातील दुष्काळ भागाची पाहणी केल्यानंतर इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांनी वसंतराव नाईकांच्या दुष्काळी कामाची खुपच प्रशंसा केली.[११]

१९७२चा अभूतपूर्वकाळ म्हणजे वसंतराव नाईक यांच्या कसोटीचा काळ होता. माणसांना जगवायचे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करायची आणि पाळीव प्राण्यांना जगविण्यासाठी चारा पुरवठा करायचा अशा तिन्ही आघाड्यांवर वसंतराव नाईक ह्यांना मोठया प्रमाणात परिश्रम घ्यावे लागले. त्या काळात रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात काढून ''मागेल त्याला काम आणि त्याच्या पोटाला दाम'' देण्यासाठी रोजगार हमी योजना तयार करण्यात आली. अशा प्रकारे दुष्काळावर मात करणाऱ्या योजना आखून त्या कार्यान्वित करून लोकंना दिलासा देण्याचे कार्य मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात केले.[१२]

अशा प्रकारे वसंतराव नाईक ह्यांनी महाराष्ट्रातील प्रगती केली असे नव्हे तर सम्पूर्ण भारत देशाला आर्थिक संकटाच्या गर्तेतून बाहेर काढले. असा महान राजनेता, कर्मयोगी, हरितक्रांतीचा जनक, शेतकऱ्यांचा मसीहा वसंतराव नाईक आपल्या कार्याने महाराष्ट्राच्याच नव्हें तर भारताच्या इतिहास अजरामर झाला, असे म्हटल्यास अतिशयोक्तिपूर्ण ठरणार नाही.

**संदर्भ :-**


१) पठाण, यू. म. 'हिरवी क्षितीजे', (१९८७) प्र. क्र. ८५.

२) कर्णिक, मधु मंगेश, 'दूत पर्जन्याचा', (१९९४) पृ क्र. २८.

३) पाटील, पंढरीनाथ, सामान्यातील असामान्य (१९७५) प्र. क्र. ५०.

४) कित्ता प्र. क्र. १८.

५) कित्ता प्र. क्र. २४.

६) राठोड, दिगंबर, 'बंजारा एकता' (एप्रिल ते जुलै २००५).

७) पाटील पृ. क्र. ३९.

८) रूद्रावार, उत्तम 'महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक' (२००४) प्र. क्र. ९२.

९) देसाई, दिनेश, दि प्लो अँड दि पाईप' (१९९३) प्र. क्र. २१.

१०) पाटील प्र. क्र. १२७.

११) पाटील प्र. क्र. ११२.

१२) भावे, मधुकर, 'यशवंतराव ते विलासराव', (२००८) प्र. क्र. ८९.


●●●